**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**
**नगर रचना विभाग**
**अधिसूचना**

वाचा : १) सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ५
२) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२, दि. ३०/०९/२०२२.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता संदर्भ क्र. १ अन्वये सन २०१५ चा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अद्यादेश क्र. ५ लागू केलेला आहे. त्या अनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता परुविवत असलेल्या सेवा अध्यादेशाच्या कलम-३ नुसार अधिसूचि करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक असल्याने, संदर्भ क्र. २ अन्वये मोबाईल टॉवर परवाना (Mobile Tower Approval) (Ground Base Tower & Roof Top Tower) ही सेवा अधिसूचित करणेबाबत शासनाचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्यानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना सदर सेवा पुरविण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे लोकसेवा अधिसूचित करण्यात येत असून, त्याची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी तसेच ती सेवा विहीत मुदतीत न पुरविल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करुन नागरिकांच्या माहितीसाठी त्यांचे जाहीर प्रकटन करण्यांत येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**
**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५**
(कलम ३ अन्वये महानगरपालिकांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील)

| अ. क्र. | लोकसेवी सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोबाईल टॉवर परवाना (Mobile Tower Approval) (Ground Base Tower & Roof Top Tower) | नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र. २४२/नवि-२०, दि.१९/१२/२०२२ नुसार Schedule-I नुसार निश्चित करण्यांत आलेली कागदपत्रे. | नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र. २४२/नवि-२०, दि.१९/१२/२०२२ नुसार Schedule-II नुसार निश्चित करण्यांत आलेली फी. | ६० दिवस | कनिष्ठ अभियंता | नगर रचनाकार | सहाय्यक संचालक, नगर रचना |

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरणलिका, भिवंडी**

Scanned with CamScanner